# पोलीस अधिक्षक कार्यालय, पालघर

## Office of Superintendent Of Police, Palghar

Phone No. 02525-297026, Mob No. 8669604100
Address: Central Administrative Builing, Bidco Road, Palghar(W.)- 401404
E-mail : sp.palghar@mahapolice.gov.in


Reference No पोअ/पालघर/आस्था-१/पोभ/का.पडताळणी/182/२०१८, Date:25/04/2018

विषय – कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहुन तात्पुरती गुणवत्ता यादी व प्रतिक्षा सूची प्रसिध्द करणेबाबत.

-----oo-----

पालघर जिल्हा पोलीस घटकाचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई संवर्गातील खालील प्रमाणे रिक्त पदे भरण्यासाठी सविस्तर जाहिरात दि.२०/०२/२०१८ रोजी पालघर पोलीस दलाच्या www.palgharpolice.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

| | खुला | अजा | अज | विज-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | ६८ | २३ | ३७ | ०५ | ०४ | ०७ | ०२ | ०४ | १० | १६० |
| कप्पीकृत आरक्षण ↓ | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २३ | ०८ | १० | ०२ | ०२ | ०४ | ०१ | ०२ | ०१ | ५३ |
| महिला | २० | ०७ | ११ | ०२ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०३ | ४८ |
| खेळाडु | ०३ | ०१ | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०७ |
| प्रकल्पग्रस्त | ०३ | ०१ | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०७ |
| भुकंपग्रस्त | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |
| माजी सैनिक | १० | ०३ | ०६ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०२ | २५ |
| अंशकालीन पदवीधर | ०३ | ०१ | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०७ |
| पोलीस पाल्य | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०४ |
| गृहरक्षक दल | ०३ | ०१ | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०७ |
| एकूण | ६८ | २३ | ३७ | ०५ | ०४ | ०७ | ०२ | ०४ | १० | १६० |

Scanned by CamScanner

पोलीस शिपाई पदासाठी मैदानी चाचणीत किमान ५०% गुण मिळालेल्या उमेदवारांपैकी, शासन परिपत्रक, गृह विभाग क्र. एमआयएस-२००८/प्र.क्र.५१८/ पोल-५अ, दि.२६ ऑगस्ट,२००८ नुसार रिक्त पदांच्या प्रवर्गनिहाय संख्येच्या १:१५ या प्रमाणात एकूण ३५०७ उमेदवारांची लेखी चाचणी दि.१०/०४/२०१८ रोजी घेण्यात आलेली आहे. लेखी चाचणी गुणांची यादी दि.११/०४/२०१८ रोजी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

लेखी चाचणीस हजर असलेल्या एकूण २८३२ उमेदवारांची मैदानी व लेखी चाचणीचे एकुण गुणांची यादी (प्रवर्ग व समांतर आरक्षणासह) दि.११/४/२०१८ रोजी संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

उमेदवारांची कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहुन तात्पुरती गुणवत्ता यादी व प्रतिक्षा सूची आज दि. २५/४/२०१८ रोजी पालघर पोलीस दलाच्या **www.palgharpolice.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येत आहे.

सदरची गुणवत्ता यादी व प्रतिक्षा सूची ही तात्पुरत्या स्वरुपाची असुन, ती अंतिम निवड यादी नाही. सदर यादीत निवड झालेल्या उमेदवारांची सर्व मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. त्यात काही त्रुटी आढळल्यास अथवा पोलीस भरतीकरीता आवश्यक असलेली कागदपत्रे पुरविण्यास उमेदवार असमर्थ असल्यास सदर यादीत आवश्यकतेप्रमाणे बदल करुन अंतिम गुणवत्ता यादी व प्रतिक्षा सूची प्रसिध्द करण्यांत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तात्पुरत्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी दि. ०९/०५/२०१८ रोजी सकाळी ०९.०० वाजता व प्रतिक्षा सूचीतील उमेदवारांनी दि. ०९/०५/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता पोलीस भरती मैदान, मौजे कोळगांव, पालघर पश्चिम येथे खालील नमुद मूळ कागदपत्र व त्यांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रतीच्या २ संचासह आणि २ पासपोर्ट साईज फोटोसह नचूकता उपस्थित रहावे.

महत्वाची सुचना –

तात्पुरत्या गुणवत्ता यादीत निवड झालेल्या उमेदवारांनी संकेत स्थळावर प्रसिध्द केलेला साक्षांकन नमुना भरुन आणावा. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचे साक्षांकन नमुने जमा करुन घेण्यात येतील याची उमेदवाराने नोंद घ्यावी. तसेच पोलीस भरती मध्ये या कार्यालयाकडुन देण्यात आलेले (ॲडमिट कार्ड ), ओळख पटविणेकरीता आधारकार्ड, पॅनकार्ड इ. कागदपत्रांसह हजर रहावे.

सदर दिवशी जे उमेदवार हजर राहणार नाहीत असे उमेदवार या जिल्हयाचे आस्थापनेवर हजर राहणेस इच्छुक नाहीत असे गृहित धरुन गुणवत्तेनुसार पुढील उमेदवार यांना कागदपत्र पडताळणीसाठी बोलविण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

Scanned by CamScanner

आवश्यक कागदपत्रांची यादी –

भरती प्रक्रियेत उमदेवारांनी अर्ज भरण्याचा दिनांक ०३/०३/२०१८ असा असल्याने आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे प्राप्त करुन घेण्याचा अंतीम दिनांक ०३/०३/२०१८ असा आहे.

अ) शाळा सोडल्याचा दाखला/१० वी चे प्रमाणपत्र.

ब) जन्म दाखला.

क) १२ वी शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र गुणपत्रक.

ड) अधिवास (डोमेसाईल) प्रमाणपत्र.

इ) जात प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांनी संबंधित प्रवर्गाचे विधीग्राहय जात प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमिलेयर) प्रमाणपत्र. (अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती प्रवर्ग वगळून)

ई) समांतर आरक्षण (माजी सैनिक/ होमगार्ड/ प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त/ अंशकालीन पदवीधर/ पोलीस पाल्य/ ३० % महिला आरक्षण इत्यादी) मागणी केली असल्यास त्याबद्दलचे विधीग्राहय प्रमाणपत्र.

खेळाडू उमेदवार- विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र.

- उमेदवाराने लागू असलेल्या प्रमाणपत्रांची मूळ (Original) व सुस्पष्ट दिसतील अशा साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळण्याकरिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत. मुळ प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यांत येईल. जात वैधता प्रमाणपत्र वगळून इतर सर्व आवश्यक ती प्रमाणपत्रे ही आवेदन अर्ज भरण्यांच्या अंतिम दिनांक म्हणजेच दि. ०३/०३/२०१८ पर्यन्तची असणे आवश्यक आहे. (अपोमसं यांचोकडील दि.२८/०२/२०१८ रोजीचे पत्र )
- उमेदवाराने आवेदन अर्ज सादर करतांना ज्या सामाजिक/समांतर आरक्षणचा लाभ मिळण्यांसाठी विनंती केली आहे, त्याच सामाजिक/समांतर आरक्षणाबाबतची प्रमाणपत्रे विचारात घेण्यांत येतील. कागदपत्र पडताळणीच्या वेळी अन्य कोणत्याही सामाजिक/समांतर आरक्षणाचे प्रमाणपत्र विचारात घेतले जाणार नाही. तसेच, याबाबत आवेदन अर्जात कोणताही बदल करता येणार नाही अथवा लाभ दिला जाणार नाही. आवेदन अर्जात दावा केल्यानुसार त्याबाबतची प्रमाणपत्रे/ कागदपत्रे उमेदवारांनी सादर न केल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यांत येईल.
- आवेदन अर्जातील चुकांना उमेदवार स्वत: जबाबदार राहतील व त्याबाबत त्यांना कोणताही दावा/दुरुस्ती करण्यांचा हक्क राहणार नाही.

२८.०५

( मंजुनाथ सिंगे)

अध्यक्ष, पालघर जिल्हा पोलीस भरती

तथा पोलीस अधीक्षक, पालघर

Scanned by CamScanner